# शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे.

फडकेपाडा, भारतगिअर्स कंपनी समोर, खार्डीगांव, मुंब्रा, ठाणे ४०० ६१२
ई-मेल principal.gpthane@dtemaharashtra.gov.in

# नो रॅगिंग

**विश्वासाची साथ संगत, रॅगिंगशी घेऊ फारकत**

महाराष्ट्र रॅगिंग मनाई कायदा-१९९९

वरील कायदा दिनांक १५ मे १९९९ पासून अमलात आलेला असून त्यात रॅगिंग करण्या-यावर खालील कारवाईची तरतुद आहे.

अ) कुठल्याही शिक्षण संस्थेच्या आवारात किंवा रॅगिंग या कृत्यास मनाई आहे.

ब) जी कुणीही व्यक्ती शैक्षणिक संस्थेच्या आत वा बाहेर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे रॅगिंग करेल, रॅगिंग मध्ये भाग घेईल वा रॅगिंग कृत्यास मदत करेल किंवा प्रोत्साहन देईल. त्यास गुन्हा सिध्द झाल्यास २ वर्षापर्यंत कैद आणि/अथवा १० हजार रूपयापर्यत दंडास पात्र राहील.

क) रॅगिंगचा गुन्हा सिध्द झालेल्या विद्यार्थ्यास त्या शिक्षण संस्थेतून बरखास्त केले जाईल. आणि या विद्यार्थ्यांस गुन्हा सिध्द झाल्याापासून पुढील ५ वर्षापर्यत कुठल्याही इतर शिक्षण संस्थेत प्रवेश दिला जाणार नाही.

ड) ज्यावेळेस एखादा विद्यार्थी किंवा आईवडील/पालक वा शैक्षणिक संथेचे शिक्षण रॅगिंग झाल्याबाबची लेखी तक्रार शिक्षण संस्थेच्या प्रमुख्याकडे देतील त्यावेळेस संस्थाप्रमुख वर निर्देशित तरतुदीबाबत पूर्वग्रह न ठेवता तक्रार मिळाल्याच्या सात दिवसाच्या आत तक्रारीत नमूद केलेल्या गोस्टीची चौकशी करतील आणि प्रथम दर्शनी तक्रार सत्य दिसून आल्यास अशा गुन्हा केलेल्या विद्यार्थ्यांस संस्थेतुन निलंबित करतील व अशा विद्यार्थ्यांविरूध्द शिक्षण संस्था ज्या पोलिस स्टेशनच्या कारवाई हद्दीत असेल त्यांचेकडे त्वरीत तक्रार पुढील कार्यवाहीसाठी सादर करतील.

जर चौकशीअंती प्रथमदर्शनी चौकशीत तक्रारीबाबत तथ्य न आढळून आल्यास संस्थाप्रमुख सत्याबाबत लिखित माहीती तक्रारकर्त्यास देतील. याबाबतची संस्थाप्रमुखाचा निर्णय अंतीम राहील. परंतु संस्था प्रमुखांनी या बाबतीत दुर्लक्ष केल्यास वा वर निर्देशित ‘ड’ कलमानुसार तक्रारीवर कारवाई करण्यात चुकल्यास स्वतः संस्थाप्रमुखांनी गुन्हयास मदत केल्याचे मानण्यात येईल व असे सिध्द झाल्यास क्रमांक ‘ब’ मधील तरतुदीनुसार सजेस पात्र राहतील.